Vol 1 Issue 5 Feb 2012

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

**Research Papers**

# *'नव्वदोत्तर दलित कवितेतील सामाजिक जाणिवा'*

*प्रा. प्रकाश कांबळे*

*मराठी विभाग, के.एन. भिसे महाविद्यालय, कुर्डूवाडी.*

**सारांश**

माणसाचे सांस्कृतिक मूल्य जोपासणारी जाणीव म्हणजे सामाजिक जाणीव असे म्हणता येईल. लेखकाच्या अनुभूतीला सामाजिक जाणिवेचा स्पर्श झालेला असतो. लेखकाच्या जगण्याला आणि त्याच्या अभिव्यक्तीला सामाजिक जाणिवेतील घटकांनी नियंत्रित केलेले असते. लेखकाचे अनुभव जरी वैयक्तिक असले तरी त्या अनुभवांना सामाजिक जाणिवांचा रंग लाभलेला असतो. लेखक आपल्या जगण्याचा शोधच सामाजिक अंगाने घेत राहतो. त्यातून त्याला सामाजिक संदर्भात किंबहुना सामाजिक पातळीवर आलेल्या अनुभवांना तो साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. लेखकाकडून सामाजिक जाणीवेला साहित्यातून अभिव्यक्त करताना नेहमीच मानवीमूल्यांचा आग्रह धरलेला असतो. मानव हाच सर्व साहित्याच्या केंद्रस्थानी असून त्याचा सामाजिक स्थित्यंतरांच्या अनुषंगाने घेतलेला शोध महत्त्वपूर्णच नव्हे तर आवश्यकही असलेला दिसून येतो. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून नव्वद नंतरच्या दलित कवितेतील सामाजिक जाणिवांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

***प्रस्तावना :***

1990 नंतरच्या बहुतांश दलित कवींच्या कवितांमध्ये जागगिकीकरणामुळे खोलवर झालेल्या सामाजिक बदलांचे संदर्भ अत्यंत प्रभावीपणे चित्रित झालेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने अरुण काळे (नंतर आलेले लोक, सायरनचे शहर, ग्लोबलचं गावकूस), महेंद्र भवरे (महासत्तेचे पीडादान), उत्तम कांबळे (जागतिकीकरणात माझी कविता), लोकनाथ यशवंत (आता होऊन जाऊ द्या, पुन्हा चाल करु या), धम्मपाल रत्नाकर (हॉटेल माझा देश), रोहन नागदिवे (स्थितीचा ओला कोलाज), अविनाश गायकवाड (जंजाळ, अजूनही अस्वस्थ रोहिणी) आदिंच्या कवितांमधून विविध सामाजिक जाणिवा प्रतिबिंबित होताना दिसतात. जागतिकीकरणाच्या या प्रभावकाळातील प्रस्तुत दलित कविता विभिन्न सामाजिक जाणिवांनी समृद्ध झालेली दिसून येते.

जगतिकीकरणावर भाष्य करणाऱ्या काही दलित कवींच्या कवितांमध्ये जागतिकीकरणाच्या फक्त आगमनाचे संदर्भ आढळतात. काहींची कविता मात्र या प्रक्रियेने दलित समूहावर घडवून आणलेल्या परिणामांचे भेदक चित्रण करते. या प्रक्रियेमुळे घडलेल्या प्रगतीतील अंतर्विरोधाकडे काहीजण लक्ष वेधतात. तर काही कवींना जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर दलित चळवळीची झालेली पिछेहाट अस्वस्थ करते.

दलित कवितेतील नवी पिढी ही तीव्र सामाजिक भान जोपासणारी आहे. ही पिढी राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घडामोडी आणि त्यांचे दलित समूहांवर होणारे परिणाम यांची निरीक्षक आहे. त्यामुळेच जागतिकीकरणसारख्या बहुव्यापी प्रक्रियेच्या आगमनाचे सूचन त्यांच्या कवितांमधून आढळते. अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहात लिहितात,

'ह्या दहा बाय दहाच्या शहरात । का आलास विसर्जित व्हायला ?
तुझा हात तुझ्या हातात द्यायला । कोण आहे इथं ?
हा नवटाक पावशेर घाम विकून । कसं थांबवशील सक्तीचं कुपोषण?'
(नंतर आलेले लोक, पृ. 57)

अंतःकरण हेलावून टाकणारा कवीचा हा सवाल दलितांच्या बिकट स्थितीची कल्पना देतो. दलितांसाठी इथे काय आहे? असा अस्वस्थ करणारा प्रश्न कोणत्याही संवेदनशील माणसाच्या मनात ही कविता वाचून निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. दलितांच्या या विपन्नावस्थेचे चित्रण करताना आणखी एका कवितेत अरुण काळे लिहितात,

'भटक्यांसाठी विसाव्याचं झाड नाही । महाजालाच्या रानात
कुळकायद्यानं मिळत नाही । साहित्यात मालकी
मालकीची होत नाही बटई । कुणी लाभार्थी, कुणी वागर्थी
कसेल त्याची जमीन । नसेल त्याचं काय । दहा टक्क्यांना शंभराचं मोल नाय'
(नंतर आलेले लोक, पृ. 83)

दहा टक्क्यांना शंभराचं मोल नाय अशा शब्दात अरुण काळे जागतिकीकरणामुळे घडणाऱ्या तथाकथित विकासातील अंतर्विरोध स्पष्ट करतात. समतेच्या तत्त्वालाच हरताळ फासणारे हे

**Please Cite This Article As :** *प्रा. प्रकाश कांबळे* **, "***'नव्वदोत्तर दलित कवितेतील सामाजिक जाणिवा'***" : Review of Research (Feb ; 2012)**

जागतिकीकरण म्हणजे दलितांसाठी अगतिकीकरणाचे आहे याचा प्रत्यय अरुण काळेंसह सर्वच दलित कवी आपल्या कवितांमधून पुन्हा पुन्हा देताना दिसतात.

जागतिकीकरणामुळे शिक्षणाला अक्षरशः बाजारू स्वरुप आल्याचे दिसते. व्यापारी प्रवृत्ती शिक्षणातही शिरल्यामुळे ज्ञानासारखी पवित्र गोष्टही विकावूझाली. शिक्षण ही अत्यंत महागडी वस्तू झाली. याचा दूरगामी परिणाम दलित समाजावर झालेला दिसतो. आनंद तेलतुम्बडे याविषयीचे आपले चिंतन नोंदविताना लिहितात, "सकारात्मक धोरण घेतल्यास दलितांमध्ये साक्षरता आणि गळती याबाबत सुधारणा निश्चित दिसून येते. पण गुणवत्तेच्या बाबतीत त्यांना परिघाच्या बाहेरच ठेवण्यात आले आहे. दलितांना सक्षम करण्यामध्ये शिक्षण हे सर्वात मोलाचे साधन बनले आहे. तेच आता जागतिकीकरणाच्या तडाख्यात सापडून कोसळण्याच्या बेतात आहे."[1] आनंद तेलतुम्बडे यांचे हे निरीक्षण नेमके आहे. शिक्षणाच्या बाजारीकरणाचा खूप मोठा फटका दलित समाजाला बसताना दिसतो.

जागतिकीकरणामुळे दलित बहुजनवर्गाच्या उपजीविकेचे साधन असलेली लोककलाही लयाला गेली. या लोककलेच्या अस्तंगत होण्याच्या अस्वस्थ जाणिवांनी दलित कवितेचे व्यापक क्षेत्र व्यापलेले दिसते. आधुनिक जीवनाच्या संकल्पना जनमाणसात रूजल्यामुळे मनोरंजनाची नवी साधने निर्माण झालेली दिसतात. माध्यमक्रांतीमुळे डिस्को डान्स, अंताक्षरी, चित्रपट, गाणी, फॅशन शो यांसारख्या साधनांनी लोकांच्या मनावर गारूड केलेले दिसते. त्यामुळे तमाशा, मेळे, कलापथके यांसारखी मनोरंजनाची पारंपरिक कलासाधने संपुष्टात आली. याचे संदर्भ अरुण काळे यांच्या कवितेमध्ये आढळतात. एका कवितेत ते लिहितात,

'पायी फिरणारे शहर ट्रॅकचे ॲडिक्ट झाले तमाशा, बोहाडे, मेळे, कलापथकं
गायनपार्ट्या गेल्या फॅशन–शो–डिस्को–दांडीया, आंताक्षरी आल्या....
.(ग्लोबलचं गावकूस, पृ. 65)

रोजगारासाठी महानगरांमध्ये स्थलांतरित होऊन कारखान्यामध्ये, कंपन्यांमध्ये काबाडकष्ट करणाऱ्या दलितांच्या स्थितीचाही दलित कवी आढावा घेतात. त्यांच्या जगण्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या विभिन्न सामाजिक जाणिवा नव्वदोत्तर दलित कवींच्या कवितेतील एक मुख्य घटक असल्याचे दिसून येते. कारखानदारांमध्ये नफा कमावण्याची जीवघेणी स्पर्धा आज सुरू आहे. त्यामुळे कामगारांकडून दिवसरात्र कष्ट करुन घेतले जातात. त्यांच्या स्वास्थ्याचा विचार कुणीच करताना दिसत नाही. त्यांना पुरेसा मोबदला दिला जातना दिसत नाही. उत्तम कांबळे एका कवितेमध्ये लिहितात,

'श्रमाबरोबरा सारा माणूसच । विकत घेऊ पाहणारी दुनिया । परवा ।
ती गुलाम विकत घेत होती । काल । भूदास विकत घेत होती । आज ।
श्रमदास विकत घेत आहे' .....(जागतिकीकरणात माझी कविता, पृ. 112)

आधुनिकतेचा टेंभा मिरवणारी ही जागतिकीकरणाची प्रक्रिया अशा प्रकारे दलितांच्या शोषणाची सनातन परंपराच पुढे नेताना दिसते. गुलाम – भूदास – श्रमदास हा क्रम म्हणजे मागील प्रकरण पुढे चालू असाच प्रकार आहे. शोषणाच्या फक्त पद्वती बदलल्या आहेत. शोषित मात्र तेच आहेत. म्हणूनच धम्मपाल रत्नाकर यांसारखा कवी लिहितो,

'इथं मोलाचं कष्ट आहे । पण कष्टाला मोल नाही ।
माणसाला संदर्भ नाही । संदर्भाला माणूस नाही ।
फक्त आहेत अश्रू । हरेक कामगार माणसाच्या असाहाय डोळयात
म्होरीत तुंबलेल्या । खरकटया पाण्यासारखे......(हॉटेल माझा देश, पृ. 6)

मजुरांच्या अतोनात शोषणाविषयीची जाणीव धम्मपाल रत्नाकर यांच्या उपरोक्त कवितेतून व्यक्त होताना दिसते. सामान्य माणसाच्या जीवनाचे चौफेर सुरू असणारे अधःपतन प्रस्तुत कविता अत्यंत टोकदारपणे चित्रित करते.

जागतिकीकरणामुळे माणसे जागतिक पातळीवर एकमेकांशी बांधली गेली. मात्र सामाजिक पातळीवर एकमेकांपासून विभक्त झाली. टी.व्ही., मोबाईल, इंटरनेट यांसारखी आत्याधुनिक साधने, उपभोगवाद, चंगवळवाद यांमुळे माणसे आत्ममग्नझाली. माणसांना दुसऱ्या माणसांविषयी काहीच वाटेनासे झाले. प्रत्येकजण स्वतःपुरता विचार करु लागला. या बधीर सामाजिक जाणिवेमुळे सामाजिक विषमतेला नकळतपणे खतपाणी मिळत गेल्याचे दिसते.

अनेक दलित कवींनी या बधीर सामाजिक जाणिवेवर प्रतिक्रिया दिलेली दिसून येते. जग जवळ येत असताना माणसामाणसांमधील वाढत चाललेल्या अंतराकडे निर्देश करताना उत्तम कांबळे लिहितात,

'कोण्या एके काळी । मैलाच्या दगडावरुन । कळायचे अंतर । आता माणसा–माणसातलं
गावा–गावातलं । झाडा–झाडातलं । अंतरच वाढत असेल तर । वेध कसा घ्यावा ।
मैलाच्या दगडांनी ....(जागतिकीकरणात माझी कविता, पृ. 57)

उपभोगवाद आणि चंगळवादाने माणसाच्या स्व–विषयक जाणिवा आणि सामाजिक भान दोन्ही बधीर करुन टाकले आहे. म्हणून नंतर आलेले लोक मध्ये अरुण काळे लिहितात,

'संस्काराच्या तुझ्या जाणिवा आपोआप जातील
मग काय प्रॉब्लेम उरणार नाही । घरपोच कर्ज, काम सुलभ
सतराशे साठ चॅनल्स घे आस्वाद । वापर अन फेक, कर आराम
मोठया घरात बाजार, डोकं नको चालवू । दुचाकी चालव, रिमोट चालव
यातच तुझं कल्याण ....(जागतिकीकरणात माझी कविता, पृ. 57)

अत्यंत उपहासात्मक शैलीत अरुण काळे संवेदनशीलता हरवत चाललेल्या माणसाचे चित्र रेखाटतात. विचार करण्याचे आणि प्रश्न विचारण्याचे दिवस आता संपले आहेत. आता फक्त खायचे, प्यायचे, मनोरंजनाचे आणि मजेत जगायचे, जगण्याची ही नवी परिभाषा बनू पाहते आहे. जागतिकीकरणामधील हा खूप मोठा अंतर्विरोध म्हटला पाहिजे. उत्तम कांबळे एका कवितेमध्ये हा विरोधाभास मांडतात,

आता ती जात विचारताहेत । आपल्या खांद्यावरील पक्षांना,
धर्म विचारताहेत त्यांच्या घरटयांना । एवढंच काय
पंथ, प्रदेश, भाषा, संस्कतीही विचारताहेत ....(जागतिकीकरणात माझी कविता, पृ. 29)

जागतिकीकरणातील ही विसंगती अस्वस्थ करणारी आहे. या विसंगतीची कारणमीमांसा करताना हरिश्चंद्र थोरात लिहितात, "जात आणि वर्ग या दोन पातळयांवर घडणाऱ्या घटनांमधून समकालीन जीवनाला एक नवा अंतर्विरोध निर्माण झाला आहे असे म्हणता येईल. आणि या अंतर्विरोधातून आयडेंटीविषयीच्या काही

नव्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते आहे. या अंतर्विरोधाचा परिपाक म्हणूनच आजच्या आयटीच्या युगातही जाती–धर्मावरुन भीषण दंगली होताना दिसतात, निरपराध माणसे मारली जातात."[2] माणसा–माणसांतील दिवसेंदिवस वाढत चाललेले अंतर आणि त्यामुळे एकूणच वाढत चाललेला विसंवाद ही नव्या युगाने आपणाला दिलेली फार मोठी अस्वस्थता आहे.

एकूणच नव्वदोत्तर दलित कवितांमधील सामाजिक जाणिवांचा शोध घेतल्यानंतर हाती आलेले निष्कर्ष सूत्ररुपाने आपणास पुढीलप्रमाणे मांडता येतील.

1.नव्वदोत्तर दलित कविता ही तीव्र सामाजिक भानाची, जाणिवांची कविता असलेली दिसून येते. दलित कविता ही माणसाच्या आतील माणूसपणाला स्वीकारणारी, पेटवणारी कविता आहे.
2.सामाजिक जाणिवा हा नव्वदोत्तर दलित कवितेचा स्वाभाविक गुणधर्म आहे. मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी ही कविता माणूसकीच्या निर्माण क्षमतेचा प्रत्यय देताना दिसते.
3.मानवी भावभावनांचा, त्याच्या स्वातंत्र्याचा, माणूस म्हणून जगण्याच्या प्रकियेचे स्वागतशील कविता म्हणून नव्वदोत्तर दलित कवितेचा उल्लेख करावा लागतो.
4.दलितांच्या जगण्यातील अस्वस्थ, अन्यायी प्रतिकियांचे, वास्तव चित्रणाचे साक्षेपी संकलन करणारी कविता म्हणून याकडे पाहिले जाते.

***संदर्भः–***

1)आनंद तेलतुम्बडे, जागतिकीकरणाची अरिष्टे, संपा. उत्तम कांबळे, कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सवी समिती, कोल्हापूर, प.आ. 2010, पृ.141
2)हरिश्चंद्र थोरात, समकालीन मराठी कवितेचे सामाजिक– सांस्कृतिक संदर्भ, नवाक्षर दर्शन, संपा. प्रवीण बांदेकर, जाने.ते मार्च 2007, पृ. 19

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com